| आरोग्य विभाग | जि. प.सांगली |
|---|---|
| दुरध्वनी - ०२३३- २३७३०३२, २३७४४६२<br>फॅक्स - ०२३३ - २३७४४६२<br>Email Address :- zpdhosan@yahoo.co.in<br>phn.zpsangli@gmail.com | जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग,<br>जिल्हा परिषद सांगली कार्यालय<br>सांगली मिरज रोड, सांगली.४१६४१६ |


जा.क्र.आरोग्य/मुशुनों/शुश्रुषागृह/करावयाचे कार्यवाही/ १३१४ / २०५१ /२०२३ दि.०३-०४-२०२३

## परिपत्रक

प्रति,

तालुका आरोग्य अधिकारी,
पंचायत समिती..........(सर्व)

**विषय :- महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी (सुधारित) नियम २०२१ अधिसूचना च्या अनुषंगाने खाजगी शुश्रूषागृह मध्ये करावयाच्या कार्यवाहीबाबत..**

**संदर्भ** :-१) सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई विभागाकडील महाराष्ट्र शासन राजपत्र (असाधारण भाग ४ - ब) दिनांक - १४ जानेवारी २०२१ - दुसरी सुधारणा.

२) या कार्यालयाकडील जा.क्र.आरोग्य / मुशुगृनोंदणी/६२५३/२०१९ दि.०३-१२-१९ रोजीचे पत्र.

३) या कार्यालयाकडील जा.क्र.आरोग्य/महा.शुश्रु (सु) नियम २०२१/तक्रारनिवारणकक्ष/५१४/२१ दि.०६/०२/२१ रोजीचे पत्र.

४) या कार्यालयाकडील जा.क्र.आरोग्य/मुशुनों/शुश्रुषागृह/रुग्ण ह.सनद/ ८१८/२०२२ दि.०३/०३/२२ रोजीचे पत्र.

५) या कार्यालयाकडील जा.क्र.आरोग्य/मुशुनों/शुश्रुषागृह/करावयाचे कार्यवाही/१७५४/४५४२/२०२२ दि.१३/०५/२०२२ रोजीचे पत्र.

६) या कार्यालयाकडील जा.क्र.आरोग्य/महा.शुश्रु (सु) नियम २०२१/प्रशिक्षित व नोंदणीकृत परिचारिका/३६/१४१/२०२३ दि.०३/०१/२०२३ रोजीचे पत्र.

७) दि.३०/०३/२०२३, दि.३१/०३/२०२३, दि.०१/०४/२०२३ व दि.०२/०४/२३ रोजी दै.पुढारी या वृत्तपत्रामधील प्रसिध्द् झालेली बातमी.

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन, महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी (सुधारित) नियम २०२१ अन्वये सुधारणा झालेल्या नियमांचे आपणाला वेळोवेळी पत्राद्वारे व व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे अवगत करण्यात आले आहे.

तरी महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी (सुधारित) नियम २०२१ मधील सर्व अटी शर्ती, सुचना व नियमांचे काटेकोरपणे अंमलबजावणी करणेची आहे.

**तसेच आपले कार्यक्षेत्रात खालील महत्वाच्या घटकांचे महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी (सुधारित) नियम २०२१ मधील सुचनांचे काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे आहे,**

- **रुग्ण हक्क सनद प्रदर्शित करणे:-**

खाजगी शुश्रुषागृहामध्ये रुग्ण हक्क सनद (रुग्ण हक्क संहिता) दर्शनी भागामध्ये प्रदर्शित करण्याची आहे. (सोबत परिशिष्ठ जोडले आहे.)

याअनुषंगाने आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व खाजगी शुश्रुषागृहामध्ये रुग्ण हक्क सनद प्रदर्शित करणेविषयी लेखी समज/अवगत देऊन रुग्ण हक्क सनद प्रदर्शित केल्याची खात्री करणेचे आहे.

तसेच आपल्या भेटीदरम्यान रुग्ण हक्क सनद सुसज्ज प्रदर्शित असलेची खातरजमा करावी.

- **सेवांचे दर प्रदर्शित करणे:-**

खाजगी शुश्रुषागृहामध्ये पुरविण्यात येणाऱ्या सेवा, विविध उपचार, त्यांचे आकारण्यात येणारे सर्व प्रकारचे दर विस्तृतपणे दर्शविणारे दरपत्रक व महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी (सुधारित) नियम २०२१ मधील

अनुसूची-III मध्ये नमुद केलेल्या विशिष्ट दरांची यादी छापील स्वरुपात शुश्रूषागृह मध्ये मुख्य दर्शनी भागात ठळकपणे लावण्यात यावे, मात्र सदर दर शासनाने वेळोवेळी अधिसूचित केलेल्या दराशी सुसंगत असेल याची खातरजमा करावी.

याअनुषंगाने आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व खाजगी शुश्रुषागृहामध्ये मिळणाऱ्या सेवांचे दर प्रदर्शित करणेविषयी लेखी समज/अवगत देऊन सेवांचे दर दर्शनी भागामध्ये प्रदर्शित केल्याची खात्री करणेचे आहे.

तसेच आपल्या भेटीदरम्यान सेवांचे दर दर्शनी भागामध्ये सुसज्ज प्रदर्शित असलेची खातरजमा करावी.

- **तक्रार निवारणासाठी समुचित अधिकारी व तक्रार निवारण कक्ष :-**

ग्रामीण कार्यक्षेत्राकरीता "तालुका आरोग्य अधिकारी" यांना महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी (सुधारित) नियम २०२१ अन्वये तक्रार निवारणासाठी "समुचित अधिकारी" म्हणून नेमणूक यापूर्वीच करण्यात आली आहे.

तसेच जिल्हास्तरीय तक्रार निवारण कक्ष व आपल्या अधिपत्याखाली तालुकास्तरीय तक्रार निवारण कक्ष स्थापन केलेली माहिती आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व खाजगी शुश्रुषागृहामध्ये तक्रार निवारण कक्षाविषयक माहिती व दुरध्वनी क्रमांक (टोल फ्री क्रमांक) दर्शनी भागामध्ये प्रदर्शित केल्याची खात्री करणेचे आहे.

तसेच आपल्या भेटीदरम्यान माहिती व दुरध्वनी क्रमांक (टोल फ्री क्रमांक) दर्शनी भागामध्ये सुसज्ज प्रदर्शित केलेची खातरजमा करावी.

- **प्रशिक्षित नर्सिंग स्टाफ :-**

महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी (सुधारित) नियम २०२१ मध्ये ११ ड उपक्रमांकावर नमुद अर्हता प्राप्त अधिपरिचारिका/परिचारिका व त्यांचे खाटांच्या अनुषंगाने प्रमाण निश्चित केले आहे.

तरी सर्व खाजगी शुश्रूषागृहामध्ये परिचारिकांचे पडताळणी करुन प्रशिक्षित व नोंदणीकृत परिचारिका असल्याचे खातरजमा करण्यात यावी.

तसेच आपल्या भेटीदरम्यान प्रशिक्षित व नोंदणीकृत परिचारिका असल्याची खातरजमा करावी.

तरी आपणास सुचित करण्यात येत आहे की, आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व खाजगी शुश्रूषागृह हे महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी (सुधारित) नियम २०२१ मधील व वरील नमुद महत्वाच्या निर्देशकांचे काटेकोरपणे अंमलबजावणी करतील. या कार्यवाही दरम्यान कोणतेही खाजगी शुश्रूषागृहाने नकार, दिरंगाई अथवा टाळाटाळ करत असल्याचे निदर्शनास आल्यास त्वरीत त्या शुश्रूषागृहाचे कारवाई प्रस्ताव जिल्हा कार्यालयास सादर करावे, याअनुषंगाने त्यांचे महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी (सुधारित) नियम २०२१ अंतर्गत मान्यता रदद् प्रस्ताव प्रस्तावित करुन मान्यता रदद् करणे सोईस्कर होईल.

**सोबत :-** महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी (सुधारित) नियम २०२१ अधिसूचना प्रत जोडली आहे.

**(डॉ.दिलीप माने)**
**जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**जिल्हा परिषद, सांगली.**

**प्रत सविनय सादर,**

मा.जिल्हाधिकारी, सांगली
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा.सहसंचालक, आरोग्य सेवा (रुग्णालय व राज्यस्तर), मुंबई
मा.सहा.संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
मा.उपसंचालक, आरोग्य सेवा,कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर

RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ७, अंक ६(२)] गुरुवार, जानेवारी १४, २०२१/पौष २४, शके १९४२ [पृष्ठे १७, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## सार्वजनिक आरोग्य विभाग

१० वा माळा, जी. टी. रुग्णालय आवार, नवीन मंत्रालय,

मुंबई ४०० ००१, दिनांक १४ जानेवारी २०२१.

### अधिसूचना

**महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी नियम, २०२१.**

क्रमांक शुनोअ-२०१८/९७६/प्र.क्र.६०४/कु.क.—महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी अधिनियम, १९४९ च्या कलम १६ चे उप-कलम (१) तसेच उप कलम (२) च्या खंड (बी) व खंड (डी) मध्ये प्रदान केलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी नियम १९७३ मध्ये महाराष्ट्र शासन पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे, सदर सुधारणा उक्त अधिनियमाच्या कलम १६ चे उप-कलम (३) नुसार पूर्वप्रसिद्ध करण्यात आली आहे :—

**नियम**

**१.** या नियमांना महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी (सुधारित) नियम, २०२१ असे संबोधावे.

**२.** महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी नियम १९७३ (यापुढे मुख्य नियम म्हणून संबोधित केलेले) मधील नियम ३ पुढीलप्रमाणे बदलण्यात येत आहेत :—

" ३. **नोंदवही.**—स्थानिक पर्यवेक्षीय प्राधिकारी कलम-५ अन्वये नोंदणीकृत व्यक्तींच्या नावाची नोंद दर्शविणारी नमूना " ए " प्रमाणे इलेक्ट्रॉनिक तसेच हस्तलिखित स्वरुपात नोंदवही जतन करेल."

**३.** मुख्य नियमाच्या नियम (५) मध्ये " नमूना ' सी ' ", या शब्दानंतर पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

" स्थानिक पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांनी अधिनियमानुसार प्रदान केलेली सर्व नोंदणी प्रमाणपत्रे संबंधित महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत/कटक मंडळ (कँटोन्मेंट बोर्ड) किंवा जिल्हा परिषदा जे असेल ते आपल्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करेल."

**४.** मुख्य नियमाच्या नियम ६ च्या उप नियम (१) मध्ये पुढीलप्रमाणे बदल केलेला उप नियम समाविष्ट केला जाईल :—

" (१) शुश्रुषागृह नोंदणीचा किंवा नुतनीकरणाचा कालावधी ज्या वर्षात संपुष्टात येईल त्या वर्षाच्या जानेवारी महिन्यात नियम (७) च्या उप नियम (२) मध्ये निर्धारित केलेल्या शुल्कासह नमूना-बी मध्ये नोंदणी किंवा नुतनीकरणासाठी आगाऊ अर्ज केला जाईल."

**५.** मुख्य नियमांच्या नियम (७) मध्ये पुढीलप्रमाणे बदल केला जाईल :—

" ७. नोंदणीसाठी व नुतनीकरणासाठी शुल्क- (१) या कायद्यांतर्गत नोंदणी व नूतनीकरणासाठी शुश्रुषागृहातील खाटानुसार शुल्क आकारले जाईल व १ ते ५ खाटांसाठीचे शुल्क पुढील प्रमाणे राहील :—

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | महानगरपालिका (वर्ग अ+/अ ) क्षेत्रातील शुश्रुषागृह | : | रु. ५,००० |
| (२) | महानगरपालिका (वर्ग ब ) क्षेत्रातील शुश्रुषागृह | : | रु. ४,५०० |
| (३) | महानगरपालिका (वर्ग क ) क्षेत्रातील शुश्रुषागृह | : | रु. ४,००० |
| (४) | महानगरपालिका (वर्ग ड ) क्षेत्रातील शुश्रुषागृह | : | रु. ३,५०० |
| (५) | नगरपालिका किंवा नगरपरिषद किंवा नगरपंचायत किंवा ग्रामपंचायत किंवा इतर ग्रामीण क्षेत्रातील शुश्रुषागृह | : | रु. ३,००० |

पाच पेक्षा जास्त खाटा असलेल्या शुश्रुषागृहाला प्रत्येकी पाच वाढीव खाटांबाबत उपरोक्त दरानुसार वाढीव शुल्क आकारण्यात येईल.

(२) शुश्रुषागृहाच्या नुतनीकरणासाठी पूर्वी नोंदणी किंवा नुतनीकरणासाठी आकारलेल्या शुल्काच्या २५ टक्के वाढीव शुल्कासह शुल्क आकारले जाईल. "

**६.** मुख्य नियमातील नियम (११) नंतर खालील नियम समाविष्ट केला जाईल :-

**११ (अ). तपासणीसाठी प्राधिकृत अधिकारी :—** कायद्याच्या कलम-९ नुसार वर्षातून किमान दोनदा तपासणी करण्यासाठी स्थानिक पर्यवेक्षकीय प्राधिकारी (Local Supervising Authority) हा वैद्यकीय अधिकारी (गट-अ) रु. ५६,१००-१,७७,५०० या वेतनबँड पेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यास प्राधिकृत करेल.

**११ (ब). तक्रार निवारण कक्ष :—** (१) नोंदणीकृत शुश्रुषागृहांचे, रुग्णांच्या अधिकारांचे व जबाबदारींच्या उल्लंघनाबाबत तक्रारींचे निवारण करण्यासाठी स्थानिक पर्यवेक्षकीय प्राधिकारी टोल फ्री नंबर असलेला स्वतंत्र तक्रार निवारण कक्ष स्थापन करेल.

(२) तक्रार निवारण कक्षाचा प्रमुख हा शासन सेवेत कार्यरत अथवा सेवानिवृत्त वर्ग-१ दर्जापेक्षा कमी नसलेला S: २३ वेतन स्तर रु. ६७,७००-२,०८,७०० मधील वैद्यकीय अधिकारी/प्रशासकीय अधिकारी असेल.

(३) तक्रारींचे निराकरण करण्यासाठी तक्रारदार, प्रतिवादी व आवश्यकतेनुसार संबंधीत संस्थेच्या प्रतिनिधींची बाजू तक्रार निवारण कक्षामार्फत ऐकली जाईल.

(४) ज्या रुग्णांवर उपचार सुरु आहेत अशा प्रकरणी तक्रार प्राप्त होताच २४ तासांच्या आत सुनावणी घेण्यात येईल व इतर प्रकरणामध्ये हा कालावधी १ महिन्याचा असेल.

(५) प्रत्येक शुश्रुषागृहास स्थानिक पर्यवेक्षकीय प्राधिकाऱ्यांचे आणि तक्रार निवारण कक्षाचे संपर्क क्रमांक व इतर माहितीचा तपशील दर्शनी भागात प्रदर्शित करणे बंधनकारक राहील.

**११ (क). सुविधेत बदल, बांधकाम किंवा श्रेणीवर्धन :—** बांधकामातील, सुविधांमधील बदल किंवा रुग्णांना देय सुविधेतील श्रेणीवर्धनाबाबतची माहिती सुधारणा केल्याच्या दिनांक व केलेल्या बदलाची विस्तृत रुपरेषा, सुधारित आराखडयाच्या प्रतीसह असे बदल केल्यापासून एक महिन्यातच सक्षम प्राधिकाऱ्याला कळविण्यात येईल.

११ **(ड). कर्मचाऱ्यांचे निकष.—** (१) महाराष्ट्र वैद्यकपरिषद अधिनियम, १९६५ (महा XLVI १९६५) किंवा भारतीय वैद्यकपरिषद अधिनियम, १९५६ (१९५६ चा १०२) किंवा महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसायिक अधिनियम, १९६१ (१९६१ चा महा XXVIII) किंवा महाराष्ट्र होमिओपॅथिक व्यवसायिक अधिनियम, १९६० (१९६० चा XII) अन्वये नोंदणीकृत वैद्यकीय अधिकाऱ्यामार्फत शुश्रुषागृहात २४ तास सेवा दिली जाईल.

(२) १० व त्यापेक्षा जास्त खाटांच्या शुश्रुषागृहांसाठी किमान कर्मचारी वर्ग पुढीलप्रमाणे राहील.

| अ.क्र | कर्मचारी वर्ग | प्रत्येक पाळीत आवश्यकता |
|---|---|---|
| १ | कर्तव्यावरील वैद्यकीय अधिकारी (Duty Medical Officer ) | प्रत्येक पाळीत एक |
| २ | अर्हताप्राप्त अधिपरिचारिका (सुतिकागृहासाठी) | १० खाटांसाठी एक प्रत्येक पाळीत |
| ३ | अर्हताप्राप्त परिचारिका | एक परिचारिका ३ खाटांसाठी |

**११ (ई). शुश्रुषागृहाचे भौतिक रचना निकष.**–सदर नियम अंमलात आल्यानंतर नोंदणीकृत किंवा नुतनीकरण झालेल्या शुश्रुषागृहांना *अनुसूचि* - (I) मध्ये विहित केलेल्या किमान प्रमाणकांच्या निकषांचे पालन करणे बंधनकारक राहील.

**११** (एफ). **शुश्रुषागृहांसाठी किमान आवश्यक बाबी.**– (१) रुग्ण जीवरक्षणासाठी नियमीत तथा आपत्कालीन परिस्थितीत प्रत्येक शुश्रुषागृहांकडे खालील उपकरणे असतीलः-

(अ) इमर्जन्सी औषधांचा ट्रे

(ब) एक सक्शन मशीन व अतिरिक्त एक फुट सक्शन मशीन

(क) आठ खाटांसाठी किमान एक ऑक्सिजन सिलेंडर तथा अतिरिक्त एक ऑक्सिजन सिलेंडर

(ड) संबंधित विशेषज्ञ सेवांसाठी आवश्यक ती सर्व उपकरणे व यंत्रसामुग्री

(इ) अग्निशामक उपकरणे.

(ई) ड्रेसिंग ट्रॉली

(२) तीस पेक्षा जास्त खाटांच्या शुश्रुषागृहात स्वतंत्र प्रवेश क्षेत्र (स्वागत कक्ष), ॲम्ब्युलेटरी क्षेत्र, निदान क्षेत्र (OPD), आंतररुग्ण क्षेत्र (Ward ) व आणीबाणी क्षेत्र (शस्त्रक्रिया गृह, प्रसुती कक्ष इत्यादी).

**११** (जी). **शस्त्रक्रिया गृहांसाठी किमान आवश्यक बाबी.**– शुश्रुषांगृहातील शस्त्रक्रियागृहात पुढील सुविधा व उपकरणे आवश्यक आहेत :–

(१) ऑपरेशन टेबल

(२) चार सिलेंडर सह भुल यंत्र (ॲनास्थेशिया मशीन ) आणि तदनुषंगिक उपकरणे

(३) पल्स ऑक्सीमीटर

(४) इलेक्ट्रीक सक्शन मशीन, जनरेटर कनेक्शनसह व फुट सक्शन मशीन

(५) इमर्जन्सी मेडिसीन ट्रे

(६) शॅडोलेस लॅम्प (फिक्स किंवा मोबाईल )

(७) विशिष्ट विशेषज्ञ सेवासाठी किमान आवश्यक ती यंत्रसामुग्री व उपकरणे

(८) शस्त्रक्रिया गृहाच्या उचित निर्जतुंकीकरणासाठी आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा

**११** (एच). **अतिदक्षता विभागासाठी किमान आवश्यक बाबी.**–अतिदक्षता विभाग असलेल्या शुश्रुषागृहांमध्ये खालील सुविधा व उपकरणे असतील.

(१) प्रति खाटेला ७५ चौ. फुट चटई क्षेत्र जागा

(२) सेंट्रल ऑक्सिजन सिस्टीम किंवा प्रत्येक खाटेला स्वतंत्र ऑक्सिजन सिलेंडर व दोन अतिरिक्त सिलेंडर

(३) दोन सक्शन मशीन्स व एक फूट सक्शन मशीन

(४) प्रत्येक खाट पडद्याने विभाजीत

(५) प्रत्येक खाटेजवळ इ.सी.जी., एस. पी ओ. टू. (SPO2), NIBP सनियंत्रण उपकरण मध्यवर्ती नियंत्रण यंत्रासह (Central Monitor)

(६) व्हेंटीलेटर (Minimum Pressure Generator ) डिफीब्रीलेटर सह

(७) ICU कक्षात किमान एक एम.बी.बी. एस. डॉक्टर २४ तास कर्तव्यावर तसेच फिजीशियन (Medical ICU असल्यास) किंवा सर्जन (Surgical ICU असल्यास) ऑन कॉल उपलब्ध असणे बंधनकारक.

११ (आय). **सुतिकागृहासाठी किमान आवश्यक बाबी.—** (१) आपत्कालीन प्रसुतीसाठी मूलभूत सेवा देण्यासाठी खालील सुविधा असतील.

(अ) Foetal Doppler फिटल डॉपलर

(ब ) लेबर टेबल

(क) नवजात बालक पुनरुज्जीवन संच.

(ड) एक सक्शन मशीन जनरेटर कनेक्शनसह व अतिरिक्त एक फूट सक्शन मशीन

(इ) आठ खाटांसाठी किमान एक ऑक्सिजन सिलेंडर तसेच एक अतिरिक्त सिलेंडर.

(फ) किमान एक इनफंट वॉर्मर

(ग) Cardiopulmonary Resuscitation ( CPR ) साठी आवश्यक यंत्रसामुग्री

(ह) इमर्जन्सी ट्रे

(आय) ड्रेसिंग ट्रॉली

(जे) ऑटोक्लेव्ह

(के) अग्निशामक उपकरणे

(२) सर्व समावेशक आपत्कालिन प्रसुति सेवा देणाऱ्या सुतिकागृहामध्ये उपरोक्त नमुद सुविधांसह सिझेरियन सेक्शनसाठी आवश्यक यंत्रसामुग्री, फोरसेप, ventouse आणि इतर अनिवार्य आवश्यक उपकरणे असतील.

११ (जे). **आपत्कालिन वैद्यकीय सेवा.—** (१) सर्व शुश्रुषागृहे रुग्णांच्या आर्थिक क्षमतेचा विचार न करता गंभीर रुग्णांना प्राथम्याने मुलभूत जिवित रक्षणाच्या सेवा देईल आणि तद्नंतर आजारासंबंधी वैद्यकीय टिप्पणीसह लवकरात लवकर अशा रुग्णाला सोयीच्या नजीकच्या संदर्भ रुग्णालयात संदर्भित करेल. जिवित रक्षणासाठीचे सुवर्णकालिक (Golden Hour Treatment) उपचार पद्धतीचे/निकषाचे पालन केले जाईल.

(२) प्रत्येक शुश्रुषागृहाकडे त्यांच्या सेवा व्याप्तीनुसार जिवित रक्षणासाठी आपत्कालिन मुलभूत सोयी-सुविधा, साधनसामुग्री तथा प्रशिक्षीत वैद्यक व परावैद्यक (Paramedical) कर्मचारी वर्ग असेल.

(३) प्रत्येक शुश्रुषागृह आणी-बाणी व आपत्कालिन परिस्थितीत जिवित रक्षणासाठी योग्य कौशल्यपूर्ण सेवा देईल.

११ (के). **शुश्रुषागृहातील नोंदवही .—** शुश्रुषागृह आंतररुग्णांची नमूना ‘ ड ’ प्रमाणे नोंदवही जतन करेल.

११ (एल). **रुग्णाचा मृतदेह जवळील नातेवाईकांकडे सूपूर्त करणे.—** शुश्रुषागृहात रुग्णाचा मृत्यू झाल्यास आवश्यकतेनुसार न्यायवैद्यक प्रक्रिया पूर्ण करून नातेवाईकांकडे मृतदेह सुपूर्त केला जाईल. कुठल्याही परिस्थितीत रुग्णालयाचे देयक भरले नाही म्हणून अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव मृतदेह रोखून ठेवता येणार नाही.

११ (एम). **रुग्णालयातुन सुट्टी (Discharge).—** शुल्क अदा केले नाही या कारणास्तव रुग्णाला शुश्रूषागृह ताब्यात ठेवणार नाही.

११ (एन). **रक्त संक्रमण सेवा.—** रुग्णांच्या रक्त पुरवठ्यासाठी संबंधित शुश्रूषागृह परवानाधारक रक्तपेढीशी संलग्नित असेल. जेव्हा रुग्णाला रक्त संक्रमणाची आवश्यकता असेल त्यावेळी त्याला रक्त उपलब्ध करून देणे ही शुश्रूषागृहाची जबाबदारी असेल.

११ (ओ). **स्थानिक पर्यवेक्षकीय प्राधिकाऱ्याकडे विशिष्ठ प्रकरणांची माहिती देणे.—** शुश्रुषागृहात निदान झाल्यानंतर सोबतच्या अनुसूची II मध्ये नमुद केलेल्या आजारांची माहिती शुश्रुषागृह स्थानिक पर्यवेक्षकीय प्राधिकाऱ्यास देईल.

११ (पी). **राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमामध्ये सहकार्य.—** विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे शुश्रुषागृह राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमात सहभाग देईल. तसेच राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाची माहिती विहीत विवरण पत्रात मागणी केल्यास शुश्रुषागृह स्थानिक पर्यवेक्षकीय प्राधिकाऱ्यास देईल.

११ (क्यु) **रुग्ण हक्क संहिता.—** शुश्रुषागृहात दाखल रुग्णांना पुढीलप्रमाणे हक्क असतील :—

(अ) रुग्णाच्या आजाराबाबतची माहिती, आजाराचे स्वरूप, आजाराचे कारण, प्रस्तावित उपचार, घ्यावयाची काळजी, उपचाराचे अपेक्षित परिणाम, अपेक्षित गुंतागुंतीची शक्यता व उपचाराचा अपेक्षित खर्च इत्यादी माहिती जाणून घेण्याचा हक्क रुग्णास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस अथवा त्याच्या जवळच्या नातेवाईकास असेल.

(ब) स्त्री रुग्णाची तपासणी महिलेच्या उपस्थितीत केली जाईल.

(क) एच.आय.व्ही./एड्स झालेल्या व्यक्तीस उपचार व देखभालीचा हक्क असेल.

(ड) रुग्णाला संबंधित शुश्रुषागृहाच्या स्वागत कक्षात ठेवलेल्या तक्रार नोंदवहीत तक्रार लिहिण्याचा अधिकार असेल.

(इ) शुश्रुषागृहात कार्यरत वैद्यांचे नाव, त्यांची शैक्षणिक अर्हता, भारतीय वैद्यक परिषद / महाराष्ट्र वैद्यक परिषदेचा नोंदणी क्रमांक आणि त्याचा वैधता दिनांक दर्शविणारी यादी शुश्रुषागृहाच्या स्वागत कक्षाजवळ ठळकपणे दिसेल अशा ठिकाणी असेल.

(फ) दुसरे मत (Second-opinion) घेण्याचा हक्क रुग्णाला असेल. यासाठी आवश्यक सर्व वैद्यकीय चाचण्यांचे अहवाल रुग्णास अथवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस उपलब्ध करून दिले जातील.

(ग) शुश्रुषागृहातील दाखल रुग्णाला किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस त्याचे वैद्यकीय अभिलेख नेहमी उपलब्ध असतील. आंतररुग्ण कागदपत्रांची छायांकित प्रत मागणीनुसार उपलब्ध असेल.

(ह) रुग्णाला सुट्टी देताना रोगनिदान, वैद्यकीय निष्कर्ष, चाचण्यांचे अहवाल, दिलेले उपचार, सुट्टी देतेवेळी रुग्णाची स्थिती व पुढील सल्ला याचा उल्लेख असलेले डिस्चार्ज कार्ड दिले जाईल.

(आय) पुरविण्यात येणाऱ्या सेवा, विविध उपचार, त्यांचे आकारण्यात येणारे सर्व प्रकारचे दर विस्तृतपणे दर्शविणारे दरपत्रक अथवा अनुसूची- III मध्ये नमूद केलेल्या विशिष्ट दराची यादी छापील स्वरूपात शुश्रुषागृह मुख्य दर्शनी भागात ठळकपणे लावेल, मात्र सदर दर शासनाने वेळोवेळी अधिसूचित केलेल्या दराशी सुसंगत असेल.

(जे) दाखल करतानाच्या हमीपत्रानुसार संबंधित शुश्रुषागृहाने प्रदर्शित केलेल्या दरपत्रकानुसार दिलेल्या आरोग्य सेवेबाबतच्या देयकाची प्रतिपूर्ती करण्याची जबाबदारी संबंधित रुग्ण व त्याचे नातेवाईक यांची राहील.

(के) आरोग्य सेवा पुरवठादार आणि वैद्यक यांच्याविरुद्ध कोणत्याही प्रकारची हिंसा करण्यास रुग्ण किंवा त्याचे नातेवाईक यांना प्रतिबंध असेल. तसेच रुग्ण व त्याचे नातेवाईक शुश्रुषागृहाच्या स्वच्छता व सुरक्षाविषयक नियमांचे पालन करतील.

(७) मुख्य नियमांना जोडलेला **नमुना-क** नंतर खालीलप्रमाणे नमुना व अनुसूची समाविष्ट करण्यात येत आहे.

**नमुना - ड**

(नियम ११ के पहावा)

***नोंदणीचा नमुना***

| अ.क्र. | नाव | वय | लिंग | पत्ता | कोणी दाखल केले | भ्रमणध्वनी क्र. | तात्पुरते रोगनिदान | अंतिम रोग-निदान | न्याय-वैद्यक प्रकरण आहे/नाही | दाखल झाल्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |

| रुग्णाचा अंतिम परिणाम (Outcome) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पूर्ण बरा होऊन सुट्टी दिल्याचा दिनांक व वेळ | मुक्त केल्याचा आणि सुट्टी दिल्याचा दिनांक व वेळ | संदर्भित केल्याचा दिनांक व वेळ | वैद्यकीय सल्ल्याविरुद्ध सुट्टी दिल्याचा दिनांक | पलायन केल्याचा दिनांक व वेळ | मृत्यूचा दिनांक व वेळ |
| १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |

## अनुसूची - I

(नियम ११ - ई पहा)

## शुश्रुषागृहांसाठी किमान प्रमाणकांचे निकष

### विविध भागांसाठी निकष

| अ. क्र. (१) | बाब (२) | क्षेत्रफळ (३) |
|---|---|---|
| १ | वॉर्डमध्ये प्रत्येक खाटेसाठी किमान चटई क्षेत्र (एकूण वार्डचे क्षेत्रफळ / खाटांची संख्या) | किमान ६५ चौ. फूट |
| २ | दोन खाटांमधील किमान अंतर | सहा फूट |
| ३ | भिंतीमधील दरवाजांची किमान रुंदी | तीन फूट |
| ४ | सर्व वार्डांमधील कड्यांची किमान उंची (डॅडो) | तीन फूट |
| ५ | स्नानगृह व शौचालयासाठी पुरविण्यात येणारे किमान क्षेत्र | ३६ चौ. फूट |
| ६ | शौचालयांची संख्या | आठ खाटांसाठी एक शौचालय. |
| ७ | स्नानगृहांची संख्या (स्नानगृह व शौचालये ही वेगवेगळी असतील) | चार खाटांसाठी एक स्नानगृह |
| ८ | वॉश बेसिन संख्या | चार खाटांसाठी एक |
| ९ | स्वच्छता क्षेत्र, शस्त्रक्रियागृहाचा न्युट्रल झोन (शस्त्रक्रियागृह असल्यास) | अनुक्रमे १०० चौ. फूट व १२० चौ. फूट |
| १० | शस्त्रक्रियागृहासाठी किमान क्षेत्र (निर्जंतुकीकरण क्षेत्र) आणि किरकोळ शस्त्रक्रियागृह (शस्त्रक्रियागृह असल्यास) | १४० चौ. फूट |
| ११ | स्नानगृह व शौचालय असलेले प्रसूती टेबलसहित प्रसूती कक्ष (प्रसूतीगृह असल्यास) | १४० चौ. फूट + ३० चौ. फूट |
| १२ | समुपदेशन कक्ष व तपासणी कक्ष | १४० चौ. फूट |
| १३ | मॅटर्निटी होम असेल तर इनफंट वॉर्मर कक्ष (असल्यास) | १०० चौ. फूट (दोन - अर्भक वॉर्मर्ससाठी) |
| १४ | इंग्रजी, हिंदी किंवा स्थानिक भाषेमध्ये सुविधा दर्शविणारे, फायर एक्झिट किंवा आपत्कालीन मार्ग, रक्तपेढी, रुग्णवाहिका सेवा / सुविधा, व पोलीस सेवा यांचे महत्त्वाचे संपर्क क्रमांक दर्शक फलक. | स्वागतकक्ष |
| १५ | पीसीपीएनडीटी, एमटीपी व एईआरबी प्रमाणपत्र प्रदर्शित करणे. | स्वागतकक्ष |

संपूर्ण बांधकाम विद्युत लेखापरीक्षण आणि अग्निसुरक्षाविषयक सर्व निकष पूर्ण करणारे तथा आवश्यक अग्निसुरक्षा उपकरणासह परिपूर्ण असेल.

## अनुसूची - II

(नियम - ११ ओ पहा )

**स्थानिक पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांना अवगत करावयाच्या आजारांची / प्रकरणांची यादी**

(१) कॉलरा (पटकी )

(२) प्लेग

(३) घटसर्प

(४) नवजात बालकांचा धनुर्वात

(५) अ‍ॅक्युट फ्लॅसीड पॅरालेसीस (Acute Flaccid Paralysis)

(६) जॅपनीज इन्सेफलायटीस

(७) डेंग्यू

(८) इनफेक्टीव्ह हिपॅटायटीस (संसर्गजन्य कावीळ)

(९) गॅस्ट्रोइंट्रायटीस

(१०) एच.आय.व्ही तपासणी रुग्ण संख्या, त्यातील सकारात्मक व नकारात्मक रुग्णांची संख्या व सर्वसाधारण गरोदर माता मासिक तपासणी संख्या

(११) लेप्टोस्पायरोसीस

(१२) ट्यूबरक्युलोसीस (क्षयरोग)

(१३) गोवर

(१४) मलेरिया

(१५) चिकुनगुणिया

(१६) गर्भाच्या लिंगासह एकूण गर्भपाताची संख्या (१६ ते २० आठवड्यातील वैद्यकीय गर्भपात असल्यास)

(१७) स्वाईन फ्ल्यू (एच१ एन १ इन्फ्ल्यूएंझा)

*शासन अधिसूचित करेल असे आजार.

## अनुसूची - III

[नियम ११-क्यू (आय) पहा]

**शुश्रुषागृहात प्रदर्शित करावयाचे दरपत्रक**

(१) प्रवेश शुल्क
(२) प्रतिदिन आंतररुग्ण दर (खाट /अतिदक्षता कक्ष)
(३) वैद्य शुल्क (प्रति भेट)
(४) सहायक वैद्य शुल्क (प्रति भेट)
(५) भुल शुल्क (प्रति भेट)
(६) शस्त्रक्रियागृह शुल्क
(७) शस्त्रक्रियागृह सहायक शुल्क
(८) भुल सहायक शुल्क ( प्रति भेट)
(९) शुश्रुषा शुल्क (प्रति दिन)
(१०) सलाईन व रक्त संक्रमण शुल्क
(११) विशेष भेट शुल्क
(१२) मल्टिपॅरा मॉनिटर शुल्क
(१३) पॅथॉलॉजी शुल्क
(१४) ऑक्सिजन शुल्क
(१५) रेडिओलॉजी व सोनोग्राफी शुल्क.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वर्षा मुं. भरोसे,**
शासनाचे उप सचिव.

## PUBLIC HEALTH DEPARTMENT

10th Floor, G. T. Hospital, Complex Building,
New Mantralaya, Mumbai 400 001, dated the 14th January 2021.

*NOTIFICATION*

THE MAHARASHTRA NURSING HOMES REGISTRATION (AMENDMENT) RULES, 2021.

No. Shunoa-2018/976/CR 604/FW.—In exercise of the powers conferred by Sub-sections *(1)* and clauses *(b)* and *(d)* of sub-section *(2)* of section 16 of the Maharashtra Nursing Homes Registration Act (XV of 1949) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Nursing Homes Registration Rules, 1973, the same having been previously published as required by sub-section *(3)* of said section 16 of the said Act, namely :---

1. These rules may be called the Maharashtra Nursing Homes Registration (Amendment) Rules, 2021.

2. For rule 3 of the Maharashtra Nursing Homes Registration Rules, 1973 (hereinafter referred to as "the principal Rules"), the following rule shall be substituted, namely :---

" 3. *Register.*- The local supervising authority shall maintain a register manually as well as electronically in Form 'A' showing the names of persons registered under section 5".

3. In rule 5 of the principal Rules, after the word and letter "Form 'C' ", the following shall be added, namely :---

" The local supervising authority shall upload all registration certificates issued by it under the Act on the official websites of the concerned Municipal Corporation, Municipal Council, Cantonment Board or the Zilla Parishad, as the case may be".

4. In rule 6 of the principal Rules, for sub-rule*(1),* the following sub-rule shall be substituted, namely :---

"*(1)* An application for renewal of registration shall be made in Form 'B' in advance in the month of January of the year in which registration or renewal expires and shall be accompanied by such fees as prescribed in sub-rule *(2)* of rule 7".

5. For rule 7 of the principal Rules, the following rule shall be substituted, namely :---

"7. *Fees for registration and renewal of registration.- (1)* The fees to be paid for the registration and renewal, under the act shall be as per the number of beds and for the nursing homes having 1 to 5 beds the fees shall be as follows, namely:-

| | |
|---|---|
| *(1)* Nursing home situated within the area of the Municipal Corporation (Grade A+/A); | : Rs. 5000 |
| *(2)* Nursing home situated within the area of the Municipal Corporation (Grade B); | : Rs. 4500 |
| *(3)* Nursing home situated within the area of the Municipal Corporation (Grade C); | : Rs. 4000 |
| *(4)* Nursing home situated within the area of the Municipal Corporation (Grade D); | : Rs. 3500 |
| *(5)* Nursing home situated within the area of the Municipal | : Rs. 3000 |

Council, *Nagar Panchayat* and *Village Panchayat* or any other rural area.

Nursing homes having more than five beds shall be charged for every additional five beds additional fees equivalent to the above amount.

*(2)* The fees for the renewal of registration shall be 25 per cent., in addition of the last fee paid for the registration or renewal.".

6. After rule 11 of the principal Rules, the following rules shall be inserted, namely :—

"**11-A.** *Officer authorized for inspection.*—The local supervising authority shall authorize an officer not below the rank of a Medical Officer (Group A) in the pay band of rupees 56,100-1,77,500/- for the purpose of periodic inspection to be conducted at least twice a year as per section 9 of the Act.

**11-B.** *Grievances Redressal Cell.—(1)* The local supervising authority shall set up grievance redressal cell having a toll free number to redress complaints *of violations of rights and responsibilities of patients as well as* registered nursing home.

*(2)* Grievances Redressal Cell to be headed by in-service or retired Medical Officer / Administrative Officer not below the rank of Group A Officer in the Pay Matrix of S:23 Rs.67,700-2,08,700/-.

*(3)* Complainant, defendant and as per requirement representatives of concerned Association to be heard for Redressal of Grievances by the Cell.

*(4)* Hearing to be given within twenty-four hours on receipt of the Grievances if the patient is under treatment and within one month in other cases.

*(5)* Every nursing home shall display contact numbers and details of local supervising authority and grievance redressal cell.

**11-C.** *Change in facilities, construction or up-gradation.*- Any change in construction, facility or up-gradation of services provided to the patients shall be communicated to the local supervising authority together with dates on which such change has taken place with a copy of blue print of such changed plan and in any case not later than one month of such change.

**11-D** *Staffing norm.- (1)* A person registered under the Maharashtra Medical council Act, 1965 (Mah. XLVI of 1965) or the Indian Medical Council Act, 1956 (102 of 1956) or the Maharashtra Medical Practitioners Act, 1961 (Mah. XXVIII of 1961) or the Maharashtra Homeopathic Practitioners Act (XII of 1960) shall be the Medical Officer on duty rendering services round the clock in the nursing home.

*(2)* The minimum staff for ten bedded and above Nursing home shall be as follows :—

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Duty medical officer | .. | 1 in each shift. |
| 2. | Qualified midwife (in case of maternity home) | .. | 1 per 10 beds in each shift. |
| 3. | Qualified nurses | .. | 1 per 3 beds. |

**11-E.** *Norms of physical structure for Nursing Home.*—The Nursing Homes registered or renewed after coming into force of these Rules shall adhere to minimum standard norms laid down in *SCHEDULE-I*.

**11-F**. *Minimum Requirements for Nursing Home.*— (*1*) All nursing homes shall have the following instruments and equipment's required for emergency and basic life support :—

(*a*) Emergency Medicine Tray.

(*b*) One suction machine and one standby foot suction machine.

(*c*) Minimum one oxygen cylinder for eight beds with one standby cylinder.

(*d*) All necessary instruments and equipment's required for concerned specialty.

(*e*) Firefighting equipment.

(*f*) Dressing trolley.

*(2)* Nursing Home with more than thirty beds shall have independent entrance zone (Reception), ambulatory zone, Diagnostic zone (OPD), intermediate zone (ward) and Critical zone (operation theatre, labour room, etc.).

**11-G**. *Minimum requirements of Operation Theatre.*- A nursing home having Operation Theatre shall have following facilities and instruments :—

(*1*) Operation Table.

(*2*) Anesthesia Machine with four standby cylinders and accessories for anesthesia.

(*3*) Pulse Oximeter.

(*4*) Electric suction machine with generator connection and foot suction machine.

(*5*) Emergency tray.

(*6*) Fixed or mobile shadow less lamp.

(*7*) Minimum required instruments and equipment's for particular specialty.

(*8*) All necessary facilities for proper sterilization of operation theatre suit.

**11-H**. *Minimum Requirements for Intensive Care Unit.*- A nursing home having Intensive Care Unit shall have the following facilities and instruments :—

(*1*) Floor space seventy-five square feet per bed.

(*2*) Central oxygen system or one oxygen cylinder per bed with two standby cylinders.

(*3*) Two suction machines and one foot suction machine.

(*4*) Each bed separated by curtain.

(*5*) Bedside monitoring of ECG, SPO2, NIBP with central monitor.

(*6*) Ventilator (minimum pressure generator) with defibrillator.

*(7)* At least One MBBS Doctor on duty all the time with Physician (if Medical ICU) or Surgeon (if Surgical ICU) on call.

**11-I.** *Minimum requirements for Maternity Home.— (1)* A maternity Home providing basic emergency obstetric care shall have following facilities :—

(*a*) Foetal Doppler.

(*b*) Labour table.

(*c*) Neonatal Resuscitation kit.

(*d*) One suction machine with generator connection and one standby foot suction machine.

(*e*) Minimum one oxygen cylinder for eight beds with one standby cylinder.

(*f*) Minimum one infant warmer.

(*g*) All instruments equipment's required for Cardiopulmonary Resuscitation.

(*h*) Emergency Tray.

(*i*) Dressing trolley.

(*j*) Autoclaves.

(*k*) Firefighting equipment.

*(2)* A Maternity Home providing comprehensive emergency obstetric care shall have in addition to above facilities, other facilities for Caesarian section, forceps, vent house and other mandatory equipment's.

**11-J**. *Emergency Medical Services.- (1)* All nursing homes shall attend emergency patients on priority and provide them basic life support without considering the financial capability of the patient, and then may refer such patient to suitable nearest referral hospital with medical referral note about the ailments as early as possible. Necessary Golden Hour Treatment protocols must be followed.

*(2)* Every nursing home shall have all logistics for emergency basic life support with trained medical and paramedical personnel as per the scope of their service.

*(3)* Every nursing home shall extend its services with due expertise for protecting life in emergency or disaster.

**11-K.** *Register to be maintained by nursing home.-* A nursing home shall maintain a register of admitted patients in Form D.

**11-L.** *Handing over of dead body to next kins.-* If death of patient occurs in nursing home, dead body shall be handed over to the patient's next of kin after completing necessary medico legal formalities, if required, under no circumstances dead body should be withheld for non-payment of hospital bill or any other reason.

**11-M.** *Discharging of patient.-* No patient shall be detained by hospitals for non-payment of bills.

**11-N.** *Blood transfusion to patients.*- A nursing home shall have affiliation with licensed blood bank for procurement of blood for their patients. When blood transfusion is required for patient, it is the responsibility of nursing home to make it available to the patient.

**11-O**. *Cases to be reported to local Supervising Authority.* - A nursing home shall report cases of diseases mentioned in the list of diseases in SCHEDULE-II to the local supervising authority after confirmation of diagnosis.

**11-P**. *Co-operation in National Health Programs.*- A nursing home shall participate in various National Health Programs as per program guidelines. The information pertaining to National Health Programs shall be given to local supervising authorities when demanded in prescribed proforma.

**11-Q**. *Standard Charter of Patients' Rights.*- The patient admitted in nursing homes shall have following rights :—

(*a*) The patients or person authorized by patient or his next kin must receive the relevant information about the nature, cause of illness, proposed care, the expected results of treatment, possible complications and the expected costs.

(*b*) Examination of female patient should be carried out in presence of female.

(*c*) Person suffering from HIV/AIDS is entitled to treatment and care.

(*d*) To write complaints in complaint register kept in nursing home at reception counter.

(*e*) The list of Medical Practitioners along with their qualifications, MCI /MMC registration number and its validity date shall be displayed at reception zone prominently in nursing home.

(*f*) Patient has the right to seek second opinion. All medical and diagnostic reports shall be made available to the patient or authorized person to facilitate second opinion.

(*g*) Patients or person authorized by him has a right to have an access to his clinical records at all times during admission in the Nursing home. Photocopy of indoor papers shall be made available on demand.

(*h*) Discharge card should be issued to patient mentioning Diagnosis, clinical findings, results of investigations, treatment given, the patient's condition at the time of discharge and advice to patient.

(*i*) Details of all types of rates for various treatments charged by the nursing home but not more than that as notified by the Government from time to time shall be displayed by the Nursing Home at prominent place in nursing home or in printed format as per the list of charges specified in Schedule-III.

(*j*) As per the admission consent it shall be the responsibility of the patient and his next of kin to settle the bill for the health service provided by the concerned nursing home.

(*k*) Patient and his next of kin shall abstain from violence in any form against health service provider and doctor and to adhere to sanitary, security norms of the nursing home.

7. After FORM C appended to the principal Rules, the following FORM and SCHEDULES shall be added, namely :—

"FORM D"

(*See* rule 11-K)

Form of Registration

| Sr. No. | Name | Age | Gender | Address | Who has Admitted | Mobile No. | Temporary Diagnosis | Final Diagnosis | Medico-Legal Case Yes/No | Date of Admission |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) | (11) |

| Final Outcome of patient | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Cured Discharge date and time` | Relieved Discharged Date and time | Referral date and Time | Discharge Against Medical Advice Date and Time | Absconded date and time | Expired Dead date and time of Death |
| (12) | (13) | (14) | (15) | (16) | (17) |

SCHEDULE-I

(*See* rule 11-E)

MINIMUM STANDARD NORMS FOR NURSING HOMES

*CRITERIA FOR DIFFERENT UNITS*

| Sr. No. | Item | Area |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| 1 | Minimum floor space per bed in ward (Total ward area / No. of beds). | 65 sq.ft. in a ward |
| 2 | Minimum distance between centres of two beds. | 6 ft |
| 3 | Minimum width of doors in the wall. | 3 ft |
| 4 | Minimum height of dado in all wards. | 3 ft |
| 5 | Minimum area to be provided for the bath and toilet. | 36 sq.ft. |
| 6 | Number of toilets | 1 per 8 beds |
| 7 | Number of Baths (Baths and toilets should be separate) | 1 per 4 beds |
| 8 | Number of Wash basins. | 1 per 4 beds |
| 9 | Clean zone, Neutral zone of OT, if operation theatre available. | 100, 120 sq. ft. respectively |
| 10 | Minimum areas for operation theatre (sterile zone) and minor OT, if operation theatre available. | 140 sq. ft. |
| 11 | Labor room with delivery table + Bath and Toilet (if Labor room available). | 140 sq.ft. + 30 sq. ft. |
| 12 | Consulting room and Examination room. | 140 sq. ft. |
| 13 | Room for infant warmers for maternity homes, if available. | 100 sq. feet for two infant warmers. |
| 14 | Signage in English or Hindi or local language denoting facilities, fire exit or emergency exit, important Contact numbers of blood bank, ambulance service or police service. | Reception |
| 15 | PCPNDT, MTP, AERB certificate to be displayed. | Reception |

All construction should confirm to electrical Audit and fire safety norms including requisite fire safety equipment's.

SCHEDULE –II

(*See* rule 11-O)

LIST OF CASES TO BE REPORTED TO LOCAL SUPERVISORY AUTHORITY (LSA)

*(1)* Cholera

*(2)* Plague

*(3)* Diphtheria

*(4)* Neonatal Tetanus

*(5)* Acute Flaccid Paralysis

*(6)* Japanese Encephalitis

*(7)* Dengue

*(8)* Infective Hepatitis

*(9)* Gastroenteritis

*(10)* Number of persons tested for HIV, Details of those found positive and negative as well as ANC General clients.

*(11)* Leptospirosis

*(12)* Tuberculosis

*(13)* Measles

*(14)* Malaria

*(15)* Chikungunya

*(16)* Number of MTPs carried out with sex of aborted foetus (In cases of MTP between 16 to 20 weeks).

*(17)* $H_1$ $N_1$ Influenza (Swine Flu).

* Any other Cases as notified by the Government.

SCHEDULE-III

[*See* rule 11-Q (i)]

LIST OF CHARGES TO BE DISPLAYED AT NURSING HOME

1. Admission Charges
2. Charges per day (Bed/ICU)
3. Doctor charges (per visit)
4. Assistant doctor charges (per visit)
5. Anesthesia Charges (per visit)
6. Operation theatre charge
7. Operation theatre Assistant charges
8. Anesthesia Assistant charges (per visit)
9. Nursing charges (per day)
10. Intravenous Infusion and transfusion charges
11. Special visit charges
12. Multiparameter monitor charges
13. Pathology charges
14. Oxygen charges
15. Radiology and, Sonography charges.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VARSHA M. BHAROSE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या संप्रेषणानुसार सर्व आरोग्य सेवा आस्थापनांद्वारे प्रदर्शित आणि पाळल्या जाणाऱ्या रुग्णांचे हक्क आणि जबाबदाऱ्यांची सनद.

**रुग्णांचे हक्क : रुग्ण आणि त्याच्या प्रतिनिधीला क्लिनिकल स्थापनेच्या संदर्भात खालील अधिकार आहेत.**

१) प्रकृती, आजारपणाचे कारण, प्रस्तावित तपासणी आणि काळजी, उपचाराचे अपेक्षित परिणाम, संभाव्य गुंतागुंत आणि अपेक्षित खर्च याविषयीची पुरेशी संबंधित माहिती.

२) प्रदान केलेल्या प्रत्येक प्रकारच्या सेवा आणि उपलब्ध सुविधांसाठी आकारल्या जाणाऱ्या दराची माहिती देण्यात यावी. क्लिनिकल आस्थापनांनी ते स्थानिक तसेच इंग्रजी भाषेत सुस्पष्ट ठिकाणी प्रदर्शित केलेले असावे.

३) केस पेपर्स, रुग्णाच्या नोंदी, तपास अहवाल आणि तपशीलवार बिल (आयटमाइज्ड) ची प्रत उपलब्ध करण्यात यावी.

४) विशिष्ट चाचण्या/उपचारापूर्वी सूचित संमती घेण्यात यावी (उदा. शस्त्रक्रिया, किमोथेरपी इ.)

५) रुग्णांच्या पसंतीच्या योग्य डॉक्टरांकडून उपचारांबाबत दुसरे मत घेणे. उपचार करणाऱ्या हॉस्पिटलद्वारे प्रदान केलेल्या नोंदी आणि माहितीसह.

६) उपचारादरम्यान गोपनीयता, मानवी प्रतिष्ठा आणि रुग्णाच्या गोपनीयतेसाठी.

७) पुरुष चिकित्सकाद्वारे महिला रुग्णाची शारीरिक तपासणी करताना महिला व्यक्तीची उपस्थिती सुनिश्चित करणे.

८) एचआयव्ही स्थितीच्या आधारावर रुग्णावर केले जाणारे उपचार आणि वर्तनाबद्दल भेदभाव न करणे.

९) पर्याय उपलब्ध असल्यास पर्यायी उपचार निवडणे.

१०) रुग्णाचा मृतदेह कोणत्याही कारणास्तव देण्यास नाकारता येत नाही.

११) असा सल्ला दिला जातो कि, की रूग्ण दुसऱ्या रुग्णालयात हस्तांतरित करू इच्छित आहे / हॉस्पिटलमधून डिस्चार्ज घेत आहे तर 'स्वीकारलेल्या पेमेंटवर सेटल करण्याची' जबाबदारी हि हॉस्पिटल ची राहील.

१२) सदर सनदीत असे हि नमूद केले जाईल कि, रुग्णाची एचआयव्ही स्थिती किंवा इतर आरोग्य स्थिती, धर्म, वांशिकता, लिंग (ट्रान्सजेंडरसह), वय, लैंगिक अभिमुखता, भाषिक किंवा भौगोलिक / सामाजिक उत्पत्ती या सर्व बाबींमुळे रुग्णावर करण्यात येणाऱ्या उपचारांमध्ये कोणताही भेदभाव केला जाणार नाही.

१३) वैद्यकीय नोंदींचे डिजिटाईझेशन करण्यापूर्वी रुग्णाची माहिती संमती घ्यावी.

**रुग्णांची जबाबदारी:**

१) आरोग्याशी संबंधित सर्व माहिती द्या

२) तपासणी, उपचारादरम्यान डॉक्टरांना सहकार्य करा

३) सर्व सूचनांचे अनुसरण करा

४) रुग्णालयांनी मान्य केलेले शुल्क वेळेवर भरा

५) डॉक्टर आणि रुग्णालयातील इतर कर्मचाऱ्यांचा आदर करा

६) कधीही हिंसेचा अवलंब करू नका

*स्रोत: DO No Z28015/09/2018 - MII - IIMS दिनांक 2 जून, 2019 रोजी सचिव, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांनी सर्व राज्ये/ केंद्रशासित प्रदेश च्या मुख्य सचिवांना जारी करण्यात आले आणि हे NIRC रुग्णांच्या हक्क सनदेवर आधारित होते.*